कॅनडाच्या परराष्ट्र मंत्र्यांनी घेतली पंतप्रधानांची भेट (14 ऑक्टोबर 2026)

कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री महामहीम सुश्री अनिता आनंद यांनी आज पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली.

या भेटीदरम्यान, पंतप्रधान मोदी आणि परराष्ट्र मंत्री अनिता आनंद यांनी व्यापार, विज्ञान आणि तंत्रज्ञान, संरक्षण, सुरक्षा, ऊर्जा, शिक्षण, लोकांमधील परस्पर संबंध आणि बहुपक्षीय सहकार्य यांसारख्या परस्पर हिताच्या क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी आणि सहकार्य वाढवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर चर्चा केली.

पंतप्रधानांनी द्विपक्षीय संबंधांमधील गती कायम ठेवण्याच्या आणि सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारावरील वाटाघाटी लवकरात लवकर पूर्ण करण्यासह, त्याचे मूर्त परिणामांमध्ये रूपांतर करण्याच्या महत्त्वावर भर दिला.

परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही त्यांनी विचारांचे आदान-प्रदान केले.

पंतप्रधानांनी, कॅनडाचे पंतप्रधान कार्नी यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि पुढील भेटीगाठींसाठी उत्सुक असल्याचे सांगितले.

नवी दिल्ली

14 ऑक्टोबर 2026